छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी
सन्मान योजना - २०१७

शासन निर्णय दि. ९.५.२०१८ च्या अनुषंगाने योजनेच्या वाढलेल्या व्याप्तीनुसार नव्याने ऑनलाईन अर्ज सादर करणे/यापूर्वी सादर केलेल्या अर्जात विहीत केलेल्या कर्जप्रकारांच्या माहितींचा समावेश करण्याची पद्धत

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन परिपत्रक क्र.कृकमा ०४१८/प्र.क्र.५३/२-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २१ मे, २०१८

वाचा :-

१. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/२-स दि. २८.६.२०१७ व दि. ८.९.२०१७
२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२१/२-स दि. २७.७.२०१७
३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन शुद्धीपत्र क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/२-स दि. ५.७.२०१७
४. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन शुद्धीपत्र क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/२-स दि. २०.७.२०१७
५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/२-स दि. ८.९.२०१७
६. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/२-स दि. ७.१२.१७ व १२.१२.२०१७
७. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/२-स दि. २८.२.२०१८, दि.३१.३.२०१८ दि.१६.४.२०१८ व दि.०२.५.२०१८
८. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.५३/२-स दि. ९.५.२०१८

प्रस्तावना:-

शासन निर्णय दि. ०९.०५.२०१८ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेच्या व्याप्तीमध्ये वाढ करण्यात आली असून त्यानुसार या योजनेत दि.०१.०४.२००१ ते दि. ३१.०३.२००९ या कालावधीत घेतलेल्या कर्जापैकी केंद्र व राज्य शासनाच्या सन २००८ व सन २००९ च्या कर्जमाफी योजनांचा फायदा न मिळालेल्या दि. ३०.०६.२०१६ रोजी थकीत असलेल्या पीक/पुनर्गठीत व मध्यम मुदत कर्जांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर दि. ०१.०४.२००१ ते ३१.०३.२०१६ या कालावधीत वाटप केलेल्या इमूपालन, पॉलिहाऊस व शेडनेट यासाठी मध्यम मुदत कर्ज प्रकारांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी विहीत कालावधीतील सदर कर्ज प्रकारांच्या बाबतीत नव्याने अर्ज करणे किंवा यापूर्वी दि.२२.९.२०१७ पर्यंत तसेच दि.१.३.२०१८ पासून पोर्टलवर ऑनलाईन सादर केलेल्या अर्जांमध्ये सदर कालावधीतील कर्ज प्रकारांसंबंधी माहितीचा समावेश करणे आवश्यक आहे. असे करणे शक्य व्हावे याद्दष्टीने सदर कर्ज प्रकारांशी निगडित शेतकऱ्यांना त्यांच्या कर्जखात्यांची माहिती नवीन अर्जाद्वारे / या पूर्वी केलेल्या अर्जात बदल करुन ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी www.csmssy.mahaonline.gov.in या पोर्टलवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. वरीलप्रमाणे अर्ज सादर करणे किंवा पूर्वी सादर केलेल्या अर्जांच्याबाबतीत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

(I) दि. २२.९.२०१७ पूर्वी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर न केलेल्या शेतकऱ्यांसाठी नव्याने अर्ज करणे किंवा शेतकऱ्यांनी यापूर्वी (दि. ०१.०३.२०१८ पासून) सादर केलेल्या अर्जात सदर प्रकारच्या कर्ज खात्यांची माहिती समाविष्ट करण्याची पध्दत:-

या सदराखाली मोडणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अर्ज करण्याची पध्दत खालीलप्रमाणे आहे:-

(१) दि. ०१.०३.२०१८ पासून योजनेअंतर्गत सादर केलेल्या अर्जामध्ये सदर प्रकारच्या कर्जासंबंधी माहिती समाविष्ट करण्याची पध्दत:-

दि. २२.९.२०१७ पूर्वी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर न केलेल्या शेतकऱ्यांना दि. ०१.०३.२०१८ पासून सद्यस्थितीत दि. २०.५.२०१८ पर्यंत अर्ज सादर करण्याची संधी देण्यात आली असून त्यांच्यामार्फत अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ज्या शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे सन २००८ आणि सन २००९ या वर्षाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ मिळालेला नाही अशा शेतकऱ्यांना वरिल शासन निर्णयाचा लाभ घेण्याच्या अनुषंगाने दि. १.४.२००१ ते ३१.३.२००९ या कालावधीतील या योजनेत विहीत पीक/ पुनर्गठीत, मध्यम मुदत कर्ज तसेच दि. १.४.२००१ ते ३१.३.२०१६ या कालावधीतील इमूपालन, शेडनेट, पॉलीहाऊस अशा मध्यम मुदत कर्जाचा समावेश त्यांनी दि. १.३.२०१८ पासून सादर केलेल्या अर्जामध्ये करणे आवश्यक आहे.

सदर कार्यवाहीसाठी दि. १.३.२०१८ पासून अर्ज सादर केलेल्या शेतकऱ्यांनी या योजनेसाठी पूर्वीच विहीत केलेल्या नमुन्यात माहिती भरुन आवश्यक त्या माहितीसह आपल्या गावाजवळच्या आपले सरकार सेवा केंद्र/ग्रामपंचायत सेवा केंद्र चालकाकडे संपर्क साधावा. अशा शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पूर्वी ऑनलाईन सादर केलेल्या अर्जात अशा माहितीचा समावेश करुन सदर अर्ज केंद्र चालकामार्फत पोर्टलवर अपलोड करण्यात येईल व त्याबाबतची पावती अर्जदारास देण्यात येईल.

(२) दि २२.९.२०१७ पूर्वी किंवा दि. ०१.०३.२०१८ पासून आतापर्यंत ऑनलाईन पध्दतीने कोणताही अर्ज सादर न केलेल्या शेतकऱ्यांसाठी नव्याने अर्ज करावयाची पध्दत:-

वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्या शेतकऱ्यांनी दि.२२.०९.२०१७ पूर्वी व ०१.०३.२०१८ पासून दिलेल्या कालावधीत अर्ज सादर केले नाहीत, त्यांना नव्याने अर्ज सादर करण्याची पध्दत खालीलप्रमाणे राहील.

अ) सदर प्रमाणे यापूर्वी कोणताही अर्ज सादर न केलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या दि. ०१.०४.२००१ ते ३१.०३.२०१६ या कालावधीत घेतलेल्या पीक / पुनर्गठित अथवा मध्यम मुदत कर्जासाठी तसेच या कालावधीत इमूपालन, पॉलिहाऊस व शेडनेट या बाबींसाठी मध्यम मुदतीच्या कर्जासाठी शासनाने यापूर्वीच विहीत केलेल्या अर्ज नमुन्यात माहिती भरुन

जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र/ग्रामपंचायत सेवा केंद्रावर संपर्क साधून अर्ज सादर करावा.

आ) सदर प्रमाणे शेतकऱ्यांनी दिलेल्या अर्जातील माहितीच्या आधारे आपले सरकार सेवा केंद्र/ग्रामपंचायत सेवा केंद्र चालकामार्फत पोर्टलवर माहिती भरुन संबंधित शेतकऱ्यांचा अर्ज अपलोड करण्यात येईल व त्याबाबतची पावती अर्जदारास देण्यात येईल.

(II) या योजनेअंतर्गत दि.२२.०९.२०१७ पूर्वी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांच्या अर्जामध्ये वरील दि.०९.०५.२०१८ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने सदर कालावधीतील उक्त कर्ज प्रकारांची माहिती समाविष्ट करण्याची पध्दत:-

शासन निर्णय दि. २८.०६.२०१७ च्या अनुषंगाने दि. ०१.०४.२००९ ते ३१.०३.२०१६ पर्यंत वाटप केलेल्या विहीत पीक कर्ज/ पुनर्गठित, मध्यम मुदत कर्जाच्या संदर्भात सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. २२.०९.२०१७ या शेवटच्या तारखेपर्यंत शेतकऱ्यांनी आपले अर्ज सादर केलेले असून त्यानुसार सद्यस्थितीत योजनेची अंमलबजावणी चालू आहे. सदर शासन निर्णयात दि. ०९.०५.२०१८ च्या शासन निर्णयातील दि. ०१.०४.२००१ ते ३१.०३.२००९ या कालावधीत घेतलेल्या पीक / पुनर्गठित अथवा मध्यम मुदत कर्ज तसेच दि. ०१.०४.२००१ ते ३१.०३.२०१६ या कालावधीतील इमुपालन, पॉलिहाऊस व शेडनेट या बाबींसाठी मध्यम मुदतीच्या कर्जाचा समावेश नव्हता. त्या अनुषंगाने दि. ०९.०५.२०१८ च्या शासन निर्णयातील सदरील कर्ज प्रकारांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांना या कर्ज प्रकारांसंबधी माहितीचा समावेश त्यांनी दि. २२.०९.२०१७ पर्यंत सादर केलेल्या अर्जांमध्ये करणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे पध्दत विहीत करण्यात येत आहे.

अ) दि. २२.९.२०१७ पूर्वी अर्ज केलेल्या काही शेतकऱ्यांना दि. ०१.०४.२००१ ते ३१.०३.२००९ या कालावधीत घेतलेल्या थकित पीक / पुनर्गठित अथवा मध्यम मुदत कर्जासाठी केंद्र व राज्य शासनाच्या सन २००८ व सन २००९ या वर्षांच्या कर्जमाफी योजनांचा फायदा मिळालेला नाही. अशा शेतकऱ्यांना या कर्ज प्रकारांतील थकित कर्जाचा तसेच शासन निर्णय दि. ०९.५.२०१८ च्या अनुषंगाने दि. १.४.२००१ ते ३१.३.२०१६ या कालावधीतील इमूपालन, पॉलिहाऊस व शेडनेट या बाबींसाठी मध्यम मुदतीच्या कर्जासंबंधीलाभ घेण्यासाठी सदर कर्ज प्रकारांबाबतच्या माहितीचा पूर्वीच्या अर्जामध्ये समावेश करणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी यापूर्वीच विहीत केलेल्या अर्ज नमुन्यात माहिती भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह आपले सरकार सेवा केंद्र/ग्रामपंचायत सेवा केंद्रावर संपर्क साधावा.

आ) अशा शेतकऱ्यांना सदर माहितीचा समावेश करण्यासाठी त्यांनी यापूर्वी केलेल्या अर्ज क्रमांक (Application Id) किंवा आधार क्रमांक याबाबतची विचारणा केंद्र चालकाकडून करण्यात येईल.

इ) आवश्यकतेनुसार अर्ज क्रमांक किंवा आधार क्रमांक ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर, संबंधित शेतकऱ्याला यापूर्वी सादर केलेल्या अर्जातील माहिती व त्याअनुषंगाने योजनेमध्ये लाभ मिळाला असल्यास याबाबतची माहिती पोर्टलवर दिसेल.

ई) वरीलप्रमाणे दिसून आलेली माहिती या सदराखाली मोडणाऱ्या संबंधित अर्जदारांचीच आहे याची खातरजमा आपले सरकार सेवा केंद्र / ग्रामपंचायत सेवाकेंद्र चालकांनी करावी.

उ) सदरची माहिती ही संबंधित शेतकऱ्याचीच आहे याची खातरजमा झाल्यानंतरच संबंधित शेतकऱ्यांनी पुरविलेली माहिती सेवा केंद्र चालकांनी पूर्वीच्या अर्जात विहीत केल्याप्रमाणे भरुन शेतकऱ्यांचा अर्ज अपलोड करावा व त्याबाबतची पावती अर्जदारास द्यावी.

(III) इतर अनुषंगिक बाबी

(अ) सदर योजनेच्या यापूर्वीच्या निकषात कोणताही बदल करण्यात आलेला नसून दि. ०९.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये या योजनेची व्याप्ती वाढवून यामध्ये केवळ सन २००८ व सन २००९ या वर्षांच्या कर्जमाफी योजनांचा लाभ मिळाला नसलेल्या दि. ०१.०४.२००१ ते ३१.०३.२००९ या कालावधीतील पीक / पुनर्गठन व मध्यम मुदत कर्जांचा व वर नमूद केल्या प्रमाणे दि. ०१.०४.२००१ ते ३१.०३.२०१६ या कालावधीतील इमूपालन, पॉलिहाऊस व शेडनेट या मध्यम मुदत कर्जप्रकारांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(आ) सदर योजनेसाठी यापूर्वी देण्यात आलेला अर्जाचा नमुना (सोबत जोडल्याप्रमाणे) कायम असून त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. अर्जाचा नमुना या पूर्वी निश्चित केल्याप्रमाणे असून त्याची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा उपनिबंधक कार्यालय, उप/सहायक निबंधक कार्यालय, तहसिलदार कार्यालय व बँकेच्या शाखेतून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. **सदर अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ५ जून, २०१८ ही राहील**.

(इ) शेतकऱ्यांनी उपरोक्त नमुन्यामध्ये त्यांच्या संदर्भात लागू असलेली आपली माहिती भरुन आपले सरकार सेवा केंद्र/ ग्रामपंचायत सेवाकेंद्रावर संपर्क साधावा. सोबत आधार कार्ड/ आधार नोंदणी क्रमांक (EID) केल्याबाबतची पोहोच, कर्जखाते पुस्तिका/ उतारा व बचत खाते पुस्तिका, पॅनकार्ड (असल्यास), पेन्शन पीपीओ बुक, बँकेचे पासबुक यांची छायांकित प्रत/ फोटोकॉपी, कर्जखात्यांची माहिती असलेला तपशिल असलेली कागदपत्रे इत्यादी सोबत घेऊन जावीत.

(ई) शेतकऱ्यांनी ऑनलाईन पध्दतीने नव्याने अर्ज सादर केल्यानंतर / आपल्या पूर्वीच्या अर्जात नवीन कर्जखात्यांच्या माहितीचा समावेश केल्यानंतर आपले सरकार सेवा केंद्र / ग्रामपंचायत सेवा केंद्राद्वारे अर्जाची प्रत/पावती उपलब्ध करुन देण्यात येईल. अर्जदार शेतकऱ्यांनी सदरची प्रत योजनेसंबंधी संदर्भ व माहितीसाठी जतन करुन ठेवावी.

(उ) शेतकऱ्यांनी नव्याने अर्ज केल्यानंतर अथवा वरीलप्रमाणे या पूर्वीच्या अर्जात कर्जखात्यांची माहिती समाविष्ट केल्यानंतर संबंधित अर्जदाराने दिलेल्या दूरध्वनी क्रमांकावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल.

(ऊ) शेतकऱ्यांनी नव्याने ऑनलाईन अर्ज सादर करणे / पूर्वी दाखल केलेल्या अर्जामध्ये नवीन कर्जखात्यांची माहिती समाविष्ट करणेबाबतची सुविधा पूर्वीप्रमाणेच नि:शुल्क आहे. यासाठी शेतकऱ्यांना अर्ज सादर करताना आपले सरकार सेवाकेंद्राद्वारे कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

सदरचे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०५२२१०५७५४२३०२ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2018.05.22 13:15:21 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव तथा सहनिबंधक
महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
२. मा. मंत्री महसूल, मदत व पुनर्वसन सार्वजनिक बांधकाम यांचे खाजगी सचिव
३. मा. मंत्री, वित्त व नियोजन,वने यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री(सहकार) यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधीपक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, विधान भवन, मुंबई
६. मा. विधानसभा सदस्य/ विधानपरिषद सदस्य(सर्व)
७. मा. मुख्यसचिव याचे उपसचिव
८. मा. अप्पर मुख्य सचिव (वित्त)
९. प्रधान सचिव माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
१२.मुख्य महाप्रबंधक, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई
१३.मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड प्रादेशिक कार्यालय, पुणे
१४.चेअरमन, राज्यस्तरीय बँकर्स समिती बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे
१५.विभागीय आयुक्त, (सर्व)
१६.जिल्हाधिकारी (सर्व)
१७.जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१८.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई
१९.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती बँक (सर्व)
२०.निवडनस्ती **२**-स